दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २५९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.१७ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

### पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज...

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा कार्यक्रम १५ जानेवारी रोजी जाहिर करण्यात आला आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांची आज दिनांक १६ डिसेंबर रोजी मुख्यालयात निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

पनवेल महानगरपालिकेसाठी बहुसदस्यीय पद्धतीने २० प्रभागातील ७८ जागांसाठी निवडणूक होणार असून १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीसाठी ६ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त अधिकाऱ्यांमध्ये उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, अप्पर तहसीलदार तसेच महानगरपालिका व इतर शासकीय विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. प्रत्येक निवडणूक विभागासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह दोन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदान केंद्रांची व्यवस्था, उमेदवारी अर्जांची छानणी, मतदान, मतमोजणी तसेच आयोगाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे अशा विविध तरतूदींवरती यावेळी चर्चा करण्यात आली.

निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या नियमावलीनुसार कामकाज पार पाडण्याचे निर्देश दिले असून, राजकीय पक्षाशी व पोलिस विभागाची बैठक तसेच मतदान प्रशिक्षणाबाबत यावेळी नियोजन करण्यात आले.

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निष्पक्ष व शांततेत पार पडाव्यात, यासाठी प्रशासन सज्ज असून नागरिकांनीही निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक १,२,३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भारत वाघमारे (जिल्हाधिकारी -पुर्नवासन, रायगड) यांची नियुक्ती केली आहे. तसेच अर्चना प्रधान आणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ४,५,६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ज्ञानेश्वर खुटवड (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. तसेच संतोष मांढरेआणि नितीन राठोड यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग ७,८,९,१० निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमित शेडगे ( मुद्रांक जिल्हाधिकारी) यांची नियुक्ती केली आहे. नरेश पेढवी, विशाल हुडेकर,यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ११,१२,१३ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अविशकुमार सोनोने( उपजिल्हाधिकारी मेट्रो) यांची नियुक्ती केली आहे. रविंद्र सानप आणि सिध्दार्थ कांबळे यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १४.१५.१६ चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ललिता बाबर( उपायुक्त नवी मुंबई मनपा) ) यांची नियुक्ती केली आहे. जितेंद्र इंगळे आणि सौरभ परभरणकर यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग १७.१८ १९ ,२० चे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पवन चांडक (उपविभागीय अधिकारी) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारत फुलपगारे आणि कविता मोकल यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### दिबांच्या नावासाठी सदैव पाठीशी...

## लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नावा संदर्भात मंगळवारी लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव संघर्ष समितीने आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करत रायगड जिल्ह्याचे माजी खासदार आणि लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समितीचे उपाध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान सुरुवातीपासूनच विमानतळ प्रकल्पबाधित २७ गाव संघर्ष समिती ही लोकनेते रामशेठ ठाकूर आणि दि. बा. पाटील नामकरण कृती संघर्ष समितीच्या बरोबर असून, पुढेही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहणार असल्याचा निर्धार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या प्रसंगी २७ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील, उपाध्यक्ष सी. टी. पाटील, प्रवक्ते रुपेश धुमाळ, सहसचिव चेतन डाऊर, संपर्क प्रमुख किरण पवार, पद्माकर पाटील, समीर केणी तसेच अन्य पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

या भेटीबाबत समितीचे सचिव प्रेम पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी आपल्या जमिनी देणाऱ्या २७ गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित विविध प्रशिक्षण मिळावे, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे परिसरात आवश्यक जागा उपलब्ध करून दिली आहे. गेल्या चार महिन्यांपासून उलवे नोड येथील सेक्टर १२ मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना विमानतळाशी संबंधित प्रशिक्षण दिले जात आहे.

या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यासाठीच आज ही भेट घेण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. प्रेम पाटील पुढे म्हणाले की, संपूर्ण २७ गाव संघर्ष समिती ही लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्व पक्षीय कृती समितीच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही या भेटीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव दिले जाईल, हे पुन्हा एकदा ठामपणे स्पष्ट केल आहे.



## माझ्या यशाचे श्रेय माझे गुरु नरसु पाटील यांना देतो : ॲड.रत्नदिप पाटील

**दै.रायगड नगरी । उरण**

डोंबिवली येथील साई संस्थेच्या गणेश विद्यालय, एम. पी. केनीया, व्हिक्टोरीया एज्युकेयर, कै. सौ. आशाताई भानुशाली माध्य, विद्यालय अशा चार शाळांचे संयुक्त स्नेह संमेलन पार पडले. संस्थेच्यावतीने पनवेल बार असोसिएशनचे नवनिर्वाचीत अध्यक्ष ॲड.रत्नदिप पाटील यांचा संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्याहस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी ॲड. रत्नदिप पाटील म्हणाले, माझ्या यशाचे श्रेय माझे गुरु नरसू पाटील सर यांना देतो. कारण मी इयत्ता ४ थी मध्ये शिकत असताना सरांनी माझ्यातील वक्तृत्व गुण ओळखून भविष्यात तू उत्कृष्ट वकील बनशील, असा आशिर्वाद दिला होता. ते आज सत्यात उतरले आहे. सरांनी त्यावेळी अत्यंत कठोर परिश्रमाचे बाळकडू दिले. सर मुलांकडे असणारे सुप्त गुण ओळखतात आणि उत्कृष्ट पैलू पाडतात. आज या साई संस्थेत शिकत असलेल्या मुलांना फार मोठे भविष्य आहे, कारण संस्थेचे अध्यक्ष माझे सर आहेत.सरांनी शेकडो विद्याध्यर्थ्यांना घडविले आहे. यावेळी संस्थाध्यक्ष नरसू पाटील म्हणाले, माझा रत्नदिप पनवेल बार असोसिएशनच्या निवडणूकीत विजयी झाला. याचे कारण रत्नू विद्यार्थी दशेपासून प्रचंड मेहनत करत आला आहे. याचा आदर्श संस्थेतील मुलांनी घ्यावा.असे सांगत मार्गदर्शन केले. व्यासपीठावर सिने अभिनेत्री माधवी जुवेकर, प्रशासक आर. के. म्हात्रे, सत्कारमूर्ती पल्लवी मालूसरे, विश्वस्त सोनाली पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी सलग ८ वर्षे १००% निकाल लावणारे मुख्याध्यापक संदिप पिळणकर यांचेही कौतुक करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पद्मिनी पाटील, ब्रम्हानंद पाटील, डॉ. प्रणाली पाटील, प्रशासक मनोज गोसावी, मुख्याध्यापक श्रेया बागवे, संगिता पासड, नंदकुमार वाढविंदे, ॲड.संकेत घरत व विशाल साबित आदी मान्यवर उपस्थित होते.सर्व शाळांतील विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचे उत्कृष्ट कार्यक्रम पार पडले. यावेळी हजारो पालक, विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## शिवसेना-मनसे युती अंतिम टप्प्यात ; आठवडाभरात घोषणा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महापालिका निवडणुका जाहीर झाल्या तरी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युतीची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. यासंदर्भात शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राऊत, आमदार अनिल परब यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. २० मिनिटे झालेल्या या भेटीनंतर मनसे नेत्यांनी शिवसेना (ठाकरे) आणि मनसेच्या युतीची घोषणा लवकरच होईल असे सांगितले, तर संजय राऊत यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे दोघे एका व्यासपीठावर आठवडाभरात युतीची घोषणा करतील असे स्पष्ट केले.



महापालिका निवडणुकीत ठाकरे बंधूंकडून मुंबई आणि मराठी माणसाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. याच मुद्यावर अन्य महापालिकांतही निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी दोन्ही पक्षांकडून करण्यात आली आहे. महापालिका निवडणुका सोमवारी जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी युतीसंदर्भात चर्चा करण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते शिवतीर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी दाखल झाले. राज ठाकरे यांच्याशी २० मिनिटे चर्चा केल्यानंतर या बैठकीविषयीची माहिती बाळा नांदगावकर आणि अनिल परब यांनी दिली.

बैठक झाली असून या बैठकीत काही गोष्टी ठरल्या आहेत. पुन्हा एक बैठक घेणार असून त्यानंतर एक-दोन दिवसात युतीची घोषणा होईल.

जापेर्यंत अंतिम काही ठरत नाही तोपर्यंत त्यावर बोलणे उचित होणार नसल्याचे नांदगावकर म्हणाले. अनिल परब यांनीही दोन्ही पक्षाचे नेते युतीची घोषणा करतील असे सांगितले. सर्व गोष्टी चर्चेत आहेत. चर्चेअंती जेव्हा शेवटचा निर्णय होईल, तेव्हा पत्रकार परिषद घेऊन कळवले जाईल, असे ते म्हणाले.

मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, नाशिक महापालिकांत शिवसेना (ठाकरे) आणि मनसे एकत्र निवडणूक लढणार आहे. अन्य महापालिकांबाबत स्थानिक पातळीवर निर्णय घेतला जाईल.

युतीची घोषणा आठवडाभरात होईल. दोन्ही बंधू एका व्यासपीठावर युतीची घोषणा करतील. मुंबईसह २९ महापालिकांसाठी सज्ज आहोत, अशी माहिती शिवसेना (ठाकरे) नेते खासदार संजय राऊत यांनी दिली.

## महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनधिकृत बॅनर्स-पोस्टर्सवर पालिकेची धडक कारवाई





**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य निवडणूक आयोगाकडून महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ चा कार्यक्रम १५ जानेवारी रोजी जाहिर करण्यात आला आहे. या अनुषंगाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या राजकीय बॅनर्स, पोस्टर्स व फलकांवर महापालिकेकडून व्यापक कारवाई करण्यात येत आहे.

महापालिकेच्या संबंधित विभागांमार्फत शहरातील विविध प्रभागांमध्ये तपासणी करून अनधिकृतरीत्या लावलेले राजकीय बॅनर्स व पोस्टर्स हटविण्यात आले. यामध्ये अ, ब, क आणि ड या चारही प्रभागांमध्ये एकूण २७८३ अनधिकृत बॅनर्स व पोस्टर्स काढण्यात आले आहेत. यामध्ये अ प्रभागात ६११, ब प्रभागात ५१०, क प्रभागात ७६० तर ड प्रभागात ३२२ व नावडे उपविभागात ५८० बॅनर्स व पोस्टर्सचा समावेश आहे.

तसेच, बसथांबे व सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेल्या जाहिरातींपैकी ८६ ठिकाणी जाहिराती झाकण्यात (कव्हर करण्यात) आल्या असून, काढलेल्या व झाकलेल्या सामुग्रीची प्रभागनिहाय यादी ६२० आहे.

महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असून, राजकीय पक्ष, उमेदवार व समर्थकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोट-पँट घालून फिरलात तर अटक अटळ

कोट, पँट, हॅट घालून, थोडा परफ्युम लावून चार तरुण रस्त्यावर फिरताहेत. छानच दिसताहेत ते. त्यांच्या मित्रमंडळींनीही त्यांचं याबद्दल कौतुक केलं. तुम्ही कसे 'हिरो' सारखे दिसताहेत म्हणून त्यांची प्रशंसा केली, त्यामुळे या चारही तरुणांनी त्यांचा एक व्हिडीओ बनवला आणि सोशल मीडियावर टाकला. शिवाय 'लाटसाहेब' बनून रस्त्यावरही ते फिरले. पण, पोलिसांनी या चारही तरुणांना हटकले आणि त्यांना अटक केली आता त्यांची चूक काय? खरं तर त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नव्हता.. पण त्यांचा दोष एकच होता, तो म्हणजे ते अफगाणिस्तानात राहणारे आहेत आणि तालिबान्यांच्या दृष्टीनं विदेशी पेहराव करणं म्हणजे विदेशी संस्कृतीला चालना देणं आणि त्यांचे गुणगान गाणं! त्यामुळे चार तरुण विदेशी कपडे घालून रस्त्यावर फिरताहेत, शिवाय त्यांनी त्याचा व्हिडीओ बनवून तोही सोशल मीडियावर टाकलाय हे कळल्याबरोबर त्यांना ताब्यात घेण्यात आलं! या चारही तरुणांनी ब्रिटनची प्रसिद्ध टेलिव्हिजन सिरीज 'पीकी ब्लाइंडर्स' नुकतीच पाहिली होती. त्यातूनच त्यांनी प्रेरणा घेतली आणि तसाच पोशाख करून ते रस्त्यावरून फिरत होते। पण तालिबान्यांच्या मते ते विदेशी संस्कृतीला प्रोत्साहन देत होते. खरं तर अफगाणिस्तानमध्ये कोट, पेंट, हॅट घालू नये, असा काही नियम, कायदा नाही, पण तालिबान्यांच्या मते असं काही करणं म्हणजे गुन्हाच आहे. तालिबानी अधिकाऱ्यांनी या चौघा अफगाणी तरुणांवर विदेशी संस्कृतीचा प्रसार करण्याचा आरोप लावला आणि त्यांना ताब्यात घेतलं. या तरुणांची नावं असगर हुसैनाई, जलील याकूबी, अशोर अकबरी आणि दाऊद रसा अशी आहेत. चारही तरुणांचं वय साधारण विशीच्या आसपास आहे. 'सदाचार प्रसार आणि दुराचार प्रतिबंध' या 'नैतिक' कायद्याअंतर्गत अफगाणिस्तानात सामाजिक व व्यक्तिगत वर्तनांवर नियंत्रण ठेवलं जातं. ज्यात स्त्री-पुरुषांचे कपडे, वर्तन आणि पाश्चात्य किंवा परकीय संस्कृतीचं प्रदर्शन यांचा समावेश आहे. या कायद्यात लेखी शिक्षेचा उल्लेख नसला, तरी अफगाणिस्तानात स्वयंघोषित संस्कृतीरक्षक तालिबानी लोकांना ताब्यात घेणं, त्यांना जाहीर चाबकाचे फटकारे ओढणं अशा शिक्षा देतात. महिलांच्या कपड्यांबाबत तर तालिबानी अतिशय दक्ष आहेत। तालिबानी मंत्रालयाचे प्रवक्ते सैफ-उर-इस्लाम खैबर यांच्या म्हणण्यानुसार तालिबान कोणतीही पाश्चिमात्य, आधुनिक किंवा माध्यमांमधून प्रेरित गोष्ट अनुचित मानतो. इथल्या धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचं पालन प्रत्येकाला करावंच लागेल. तथापि, त्यांच्या म्हणण्यानुसार या चौघाही तरुणांना 'समज' देऊन सोडून देण्यात आलं. पण काहींच्या मते ही 'समज' म्हणजे या चौघाही तरुणांना चाबकाने फोडून काढण्यात आलं आणि आयुष्यात पुन्हा कधीही असं करणार नाही, म्हणून त्यांच्याकडून कबुली घेण्यात आली. ही घटना सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होते आहे. अनेकांनी अफगाणिस्तान आणि उत्तर कोरियाचे वाभाडे काढले आहेत. उत्तर कोरियात तर यासंबंधीचे कायदे आणखीच कडक आहेत. तिथे परदेशी चित्रपट, सीडी, व्हिडीओ पाहिल्यास पाच ते १५ वर्षांची शिक्षा आहे. त्यांचं वितरण केलं तर 'गुन्हगारांना' थेट जन्मठेप किंवा मृत्युदंडाचीही शिक्षा दिली जाते.

# वाळण येथील माजी विद्यार्थ्यांची अलिबाग येथील कुलाबा किल्ल्याला भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल वाळण येथील १९८८-८९ च्या बॅचमधील काही माजी विद्यार्थ्यांनी (रविवार दि.१४ डिसेंबर २०२५) रोजी अलिबाग येथील कुलाबा किल्लयाला भेट दिली.

याभेटी दरम्यान ड.कैलास पवार, उद्योजक श्री.प्रशांत कालगुडे, माजी सैनिक श्री.चंद्रप्रकाश ओमले, श्री.प्रकाश जाधव, श्री.रविंद्र कालगुडे, श्री.गंगाराम गोडावळे, श्री.विक्रम उत्तेकर, श्री.विठ्ठल बेंदुगडे, श्री.शांताराम कालगुडे, वाहन चालक संदिप नरे आदि उपस्थित होते.



जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग येथे कार्यरत असलेले श्री.बेंदुगडे यांच्या विनंतीस मान देवून सर्व माजी विद्यार्थी अलिबाग येथे कुलाबा किल्यास भेट देण्याकरिता आले होते. त्यानुसार त्यांनी अलिबाग येथील विविध ठिकाणच्या बीच, पर्यटन स्थळाला भेट देवून आपला आनंद व्यक्त केला.

यावेळी ड.कैलास पवार म्हणाले की, आम्ही सर्व मित्रांनी सामाजिक बांधिलकी हे तत्व सुरुवातीपासून अंगीकारले आहे. जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचे बाळकडू आम्हाला लहान वयातच आई-बाबांकडून मिळाले होते. त्यामुळे जीवनातील संघर्षाला तोंड देत असताना आपल्या अंतरमनात शिक्षणाविषयीची आस जागृत ठेवत सर्व मित्र विविध क्षेत्रात कार्य करीत आहेत. सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, सकारात्मक विचारसरणी, कठोर परिश्रम घेण्याची तयारी, प्रामाणिकपणा,अचूक निर्णय क्षमता, कर्तव्यनिष्ठा, श्रध्दा या गुणांमुळे समाज जीवनातील यशाची अनेक शिखरे आम्ही पादाक्रांत केली आहेत. सर्व माजी विद्यार्थ्यांनी चर्चासत्रात विविध विषयांवर आपली मनोगते व्यक्त केली. या भेटीदरम्यान सर्व मित्रांनी अलिबाग येथील विविध ठिकाणच्या बीच, पर्यटन स्थळाला भेट देवून मनमुराद आनंद घेत दुपारी स्नेहभोजन करुन सर्व मित्रमंडळी आपल्या महाड तालुक्यातील मूळ गावी जाण्यासाठी निघाले.

# स्वप्नोज म्हात्रे भारतीय सेनेत दाखल ; महेंद्रशेठ घरत यांनी केले अभिनंदन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील सारडे येथील हातावर पोट असणाऱ्या कुटुंबातील स्वप्नोज शशिकांत म्हात्रे हा भारतीय सेनेत अग्निवीर म्हणून दाखल झाला आहे. यासाठी त्याने नाशिक येथे गरुड झेप अकॅडमीत तीन वर्षे प्रशिक्षण घेतले. तेथे त्याने फिटनेस आणि भारतीय सेनेत दाखल होण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्याने अग्निवीर म्हणून परीक्षा दिली. नुकतेच त्याने आठ महिन्यांचे प्रशिक्षण हैदराबाद येथे घेतले. तेथे तो १८४० प्रशिक्षणार्थींत फायरिंगमध्ये पहिला आला आहे. त्यामुळे त्याची नुकतीच भारतीय सेनेत हिमाचल प्रदेशमध्ये निवड झाली आहे. भारती सेनेत दाखल होणारा स्वप्नोज हा सारडे गावातील पहिलाच तरुण आहे. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी 'सुखकर्ता' बंगल्यावर शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तके देऊन स्वप्नोजचे अभिनंदन केले आणि देशाचे मोठे कर, अशा शुभेच्छा दिल्या.

यावेळी स्वप्नोजचे वडील शशिकांत म्हात्रे म्हणाले, आमची आर्थिक परिस्थिती बेताची होती. २०१३ मध्ये सारडे ग्रामपंचायतीचा मी सरपंच होतो. तेव्हाही आणि आजही मी एका हॉटेलमध्ये काम करतो. त्यामुळे स्वप्नोज भारतीय सेनेत दाखल झाल्याचा मला सार्थ अभिमान आहे. आमचे स्वप्न त्याने पूर्ण केले; परंतु त्याच्या शैक्षणिक वाटचालीत महेंद्रशेठ घरत यांनी उत्तम सहकार्य केले आहे. ते माझ्या कायम लक्षात राहील. त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.



# मुरुड गारठले

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सलग तीन दिवस मुरुड च्या तापमान सातत्याने घट होत आहे. त्यामुळे मुरुडच्या तापमानात कमालीची घट झाली आहे. मुरुडचा पारा १६ओ खाली घसरल्याने मुरुडकरांसहीत पर्यटकही गारठलेले दिसत आहेत. दिवसा कडक ऊन तर रात्री कमालीची थंडी जाणवू लागली असल्याने महाबळेश्वर सारखा अनुभव येत आहे.

दिवाळीच्या सुट्टीनंतर थंडीच्या हंगामामध्ये शालेय सहलींना सुरुवात झाली आहे. जगप्रसिद्ध जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ मोठ्या बसेस संपूर्ण महाराष्ट्रातून दाखल होत आहेत. मुरुड मध्ये अल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याने येणाऱ्या पर्यटकांना आकर्षण निर्माण झाले आहे.

मुरुडची थंडी बोचरी असल्याने स्थानिक व पर्यटन ठिक ठिकाणी शेकोटी पेटवून आनंद घेत असल्याचे दिसून येत आहेत. डोक्यावर कान टोपी, अंगात स्वेटर घालून मॉरनिंग वॉकला जाणारी नागरिक दिसत आहेत. सकाळी शाळेत जाण्यासाठी लहान मुले थंडीमुळे उठत नसल्याने आई, बाबांचा ओरडा खात असल्याचे दिसून येत आहेत.

# १० वी-१२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अनोखा संगीत-प्रेरणात्मक कार्यक्रम

**दै.रायगड नगरी । पेण**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया (उत्त्रख) या संस्थेच्या वतीने १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने एक प्रेरणादायी व संगीत-आधारित मोटिवेशनल कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात यशस्वीरित्या पार पडला. हा कार्यक्रम संस्थेचे उएज डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमासाठी डॉ. संतोष बोराडे हे प्रमुख चेींळीींरींळेपरश्र डशिरज्ञशी म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत गिटारवादक प्रितेश चौधरी आणि तबलावादक नरेंद्र भोईर यांच्या प्रभावी संगीत टीमने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची दिली.

संगीताच्या माध्यमातून अभ्यासाचा ताण कमी करणे, आत्मविश्वास वाढवणे आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करणे याबाबत विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या व परिणामकारक पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. संगीताच्या लयीमधून संवाद कौशल्ये विकसित करणे, स्वतःची क्षमता ओळखणे आणि एकाग्रता वाढवण्याची तंत्रे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगण्यात आली. डॉ. संतोष बोराडे यांनी आपल्या जीवनातील वास्तव अनुभव, प्रेरणादायी कथा आणि विचारप्रवर्तक उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याची नवी दिशा दिली.

देशातील नामवंत क्रिकेटपटू, प्रशासकीय अधिकारी आणि कलाकारांना त्यांनी दिलेल्या प्रेरणेची उदाहरणे मांडताना एम. एस. धोनी यांचे विशेष उदाहरण देत, योग्य प्रेरणा, मानसिक बळ आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावरच भारताने २०११ चा क्रिकेट विश्वचषक जिंकला, हे प्रभावीपणे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना प्रभावीपणे व्यक्त करण्याची तंत्रे शिकवण्यात आली. त्यामुळे कार्यक्रमानंतर अनेक विद्यार्थी स्वतःहून पुढे येऊन आपले अनुभव मांडू लागले. या कार्यक्रमामुळे आमच्यात कमी वेळात मोठा सकारात्मक बदल झाला, मी हे करू शकतो, अभ्यासासाठी नवी ऊर्जा व उत्साह मिळाला अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमादरम्यान घेण्यात आलेल्या मजेदार व सहभागात्मक उपक्रमांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला. संगीत, अभिनय आणि संवाद यांचा सुरेख संगम साधत हा कार्यक्रम मनोरंजनात्मक तसेच अत्यंत प्रेरणादायी पद्धतीने सादर करण्यात आला.

# श्री राधाकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । तळा**

येथील श्री देव राधाकृष्ण नामदेव मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा उत्साही व आनंदी वातावरणात पार पडला.

तळे येथील नामदेव शिंपी समाजाच्या १२२ वर्षे पूर्वी बांधण्यात आलेल्या श्री राधाकृष्ण मंदिराचा जीर्णोद्धार दोन वर्षा पुर्वी अध्यक्ष श्री महेंद्र कजबजे व त्यांचे सहकारी बांधकाम कमिटीच्या माध्यमातून सुमारे ७० लक्ष रुपये खर्च करून करण्यात आले. अतिशय सुंदर मंदिर परिसर व कार्यक्रमासाठी सुसज्ज हॉल बांधण्यात आले मुळे साम्राज्याचे धार्मिक कार्यक्रम, लग्न सोहळे व इतर उपक्रमासाठी जागेची उपलब्धता झाली. या मंदिरात धार्मिक कार्यक्रमाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य अश्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. मंदिराचा जीर्णोद्धार द्वितीय वर्षी करीत असताना मार्गशीर्ष कृष्ण १२ मंगळवार दिनांक १६ डिसेंबर रोजी पहाटे काकड आरती चे आयोजन केले असून श्रींची विधिवत पूजा साल करी व्यवस्थापक सौ व श्री सचिन मुद्रांळे यांचे हस्ते करण्यात आली. काकड आरती हभप महेंद्र बुवा कजबजे व त्यांचे साथी यांनी पार पाडली. त्यानंतर श्री सत्यनारायणाची महापूजा. ही पूजा श्री सचिन दिलीप मुद्रांळे व सौ स्वरा सचिन मुद्रांळे यांचे हस्ते करण्यात आली. त्यानंतर दुपारी भजन त्यानंतर महाप्रसाद सौ संगीता महेंद्र कजबजे यांचे कडून देण्यात आला असून जवळपास ४५० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी शेजारती नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा संपूर्ण कार्यक्रम अध्यक्ष श्री श्रीराम कजबजे यांचे मार्गदर्शनाखाली विश्वस्त, कार्यकारिणी पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, महिला मंडळ पदाधिकारी, महिला मंडळ, युवक मंडळ पदाधिकारी, युवक मंडळ आणि समाज बांधव यांचे सहकार्यातून यशस्वीपणे पार पडला.




## हरविले आहे

याद्वारे नोटीसीद्वारे जाहीर करतो की, मी श्री.विनोद पांडुरंग म्हात्रे, रा.२/८८, जुनी पोलीस लाईन, आर.बी.चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा, मुंबई, महाराष्ट्र-४०००११ माझ्या नावे असलेले फ्लॅट नं.१०४, न्यु प्रेस्टीज गार्डन सीएचएस, पनवेल या सोसायटीचे शेअर सर्टीफिकेट पनवेल परिसरात कुठेतरी पडून गहाळ झाले आहे.

याबाबत शेअर सर्टीफिकेट हरविल्याबाबत तक्रार पनवेल शहर पोलीस स्टेशन, पनवेल मिसिंग दाखल नं.३६६/२०१६, दि.०५/०२/२०१६ अन्वये नोंद केली आहे.

तरी या सदरचे शेअर सर्टीफिकेट कोणाही व्यक्तीस आढळल्यास त्यांनी खालील पत्यावर आणून द्यावे.

दि.१६/१२/२०२५

सही/-

**श्री.विनोद पांडुरंग म्हात्रे**
**रा.२/८८, जुनी पोलीस लाईन,**
**आर.बी.चांदोरकर मार्ग, आग्रीपाडा,**
**मुंबई, महाराष्ट्र-४०००११**

## जाहिर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येत आहे की, जिल्हा रायगड, तालुका खालापूर पैकी गाव वडवळ येथील श्री. दगडु आबा उर्फ आबाजी सावंत यांचे मालकीची भूमापन क्रमांक ७२अ/१/अ/४१, क्षेत्र ०-२७-३० हे. आर. पॉ. ही मिळकत आमचे अशिल मे. बेकबेस्ट फूड्स प्रा. लि. वडवळ, तालुका खालापूर, जिल्हा रायगड यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे व त्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी सुरू आहेत असे त्यांनी सांगितले आहे.

तरी, सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीनंतर आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दि.१६/१२/२०२५

सही/-

**ॲड.श्रीराम प्रमोद ठोसर**
**मु. बी -४ लक्ष्मी व्हीला सोसायटी, ब्राह्मण आळी,**
**अलिबाग तालुका अलिबाग, जिल्हा रायगड**
**ई-मेल:** spthosar1990@gmail.com

## जाहीर समन्स

वादी तर्फे ॲड. अजय मेढी

**मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कर्जत यांचे कोर्टात**

रे.मु.नं. ६२/१४ नि.नं. ८०/ड ने.ता. ०५/०१/२०२६

**१. मंगल महादु मसणे** **२. तुकाराम महादु मसणे**
दोघे रा. शेलू, ता. कर्जत, जि. रायगड ...**वादी**

**विरुध्द**

**१. कै. वासुदेव धर्मा मसणे मयत तर्फे वारस**
**१/१. श्रीमती लक्ष्मीबाई वासुदेव मसणे वगैरे** ...**प्रतिवादी**

प्रति,
प्रतिवादी नं. १/४ सौ. अंजली मंगेश सावंत, रा. विचुंबेगाव, नवीन पनवेल, जि. रायगड
...**यांसी**

ज्याअर्थी, उपरिनमित वादी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायलयात वाद दाखल केला आहे त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगणेसाठी तुम्हास यापूर्वी रजिस्टर्ड पोस्टाने समनन्स पाठविले असता तुमचा पत्ता अपुरा आहे या कारणास्तव समन्सची बाजावणी तुमचेवर होवू शकली नाही. त्यामुळे या न्यायालयाने तुमचे नमूद पत्याचे ठिकाणी जाहीर समन्स प्रसिध्द करणेचा आदेश केलेवरुन तुम्हास असे फर्मावणेत येते की, तुम्ही सदर वादासंबंधी ता. ०५/०१/२०२६ रोजी अथवा हे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरित्या सुचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नाचे उत्तर देवू शकेल अशा वकीलांमार्फत किंवा अशा सर्व प्रश्नाचं उत्तर देवून शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलांमार्फत या न्यायालयात उपस्थित होणेसाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावणेत येत आहे आणि या द्वारे तुम्हाला हा अशा निर्देश देणेत येतो की, त्यादिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (कांउटर क्लेम)(ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमचे ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि तुम्ही तुमच्या बचावाच्या व उलट वादाच्या किंवा प्रतिवादाच्या पुष्ठर्य पुरावा म्हणून तुमचे ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सुची करुन ती सुची तुमचे लेखी निवेदना जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी व मुदतीत उपस्थित राहणेस कसुर केलेस तुमचे अनुउपस्थित वादाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देणेत येते की, वर नमूद केलेल्या तारखेला किंवा मुदतीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करणे तुम्ही कसुर केलेस तुमचा बचाव रद्द केला जाणेस पात्र ठरेल.

आज ता. १६/१२/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले.

शिक्का

**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कर्जत**

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, कर्जत**

## जाहिर नोटीस

या नोटीस द्वारे तमाम जनतेस कळविणयात येते कि, आमचे अशिल श्री सुरेश नंदकुमार अहिवले आणी श्री आतिक मुश्ताक पटेल पत्ता निको चेंबर, ऑफिस नं.४३, से-११, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई, हे खालिल वर्णनाची मिळकत १) श्री चंद्रकांत रामचंद्र कांबळे २) श्री गणेश रामचद्र कांबळे ३) सौ मंजुळा गणेश वाघमारे पत्ता- जासई. बौध्दवाडी, ता-उरण, जिल्हा-रायगड यांचेकडुन विकत घेत आहेत, सदर मिळकतीचे मुळ मालक हे श्री चंद्रकांत रामचंद्र कांबळे व इतर २ यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीचे आहे आहेत. सदर भुखंड विक्री बद्दल आमचे अशिल आणी मुळमालक श्री चंद्रकांत रामचंद्र कांबळे व इतर २ यांचे मध्ये दिनांक २/१२/२०२५ रोजी करारनामा झालेला आहे. सदर करारनामा नोटरी श्री किशोर पाटील यांचे कडे केली आहे.

**संपादीत क्षेत्राचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| जासई | ११६/१०५ | २२८ | -- | २-६-० |
| | | २३० | ४ | ०-१-० |
| | | २३१ | ८ | ०-३-१२ |

संपादित क्षेत्रफळापोटी अंदाजे क्षेत्रफळ-६२० चौ मी.

तरी वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबध, कुळवहिवाट, ताबा, साठे करार, इंजमेट, फरोक्त, बोजा दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन, असे कोणाही व्यक्ती/संस्थाचे हक्क, हितसंबध, तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे न्यायालयीन तसेच उच्च, कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाच्या आत कागद पत्रासहित खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : १६/१२/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

सही/-

**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, से-१**
**सी बीडी बेलापुर नवी मुंबई**
**८३६९०१७३६३**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री. भारत नामदेव भोईर मालकी हक्क व कब्जेवहिवाटीचे असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका-उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा- रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे पाले, येथील मिळकत भूमापन /सर्व्हे नं. २४/५/३/१ यांसी एकूण क्षेत्र ०.३५.५० हे.आर.प्र. व पोटखराबा ०.०९.२० हे.आर.प्र. आकार रक्कम रुपये ०.७० पैसे. यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख १७ डिसेंबर २०२५

सही/-

**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी,**
**शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## जिल्ह्यात कुष्ठरोग शोध अभियान यशस्वी

# १७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ दरम्यान २३ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी तसेच सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ.प्राची नेहूलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १७ नोव्हेंबर ते दि.०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात आलेले कुष्ठरोग शोध अभियान यशस्वीपणे पूर्ण झाले आहे.

२०१७ पर्यंत कुष्ठरोगाचा प्रसार शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात व्यापक सर्वेक्षण करण्यात आले. या कालावधीत ५ लाख २२ हजार ८३४ घरांना प्रत्यक्ष भेटी देऊन २३ लाख २० हजार ८९३ नागरिकांची शारीरिक तपासणी करण्यात आली. यामधून २२ हजार ६३४ संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली असून, वैद्यकीय अधिकारी व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी सखोल तपासणीनंतर १५१ रुग्ण कुष्ठरोग बाधित असल्याचे निष्पन्न केले.

नवीन आढळून आलेल्या रुग्णांमध्ये ६१ सांसर्गिक तर ९० असांसर्गिक रुग्णांचा समावेश आहे.

संबंधित सर्व रुग्णांना तात्काळ शासकीय आरोग्य संस्थांमार्फत मोफत औषधोपचार सुरू करण्यात आले असून नियमित फॉलो-अप, समुपदेशन व आवश्यक ते मार्गदर्शन देण्यात येत आहे. कुष्ठरोग हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेत निदान व उपचार केल्यास अपंगत्व टाळता येते, असे आरोग्य प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्हा आरोग्य यंत्रणा, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्यामुळे हे अभियान यशस्वी ठरल्याचे प्रशासनाने नमूद केले.

दरम्यान, त्वचेवर पांढरे किंवा लाल डाग, न खाजणारे चट्टे, बधिरता, जखमा न भरणे अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा. तसेच कुष्ठरोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून रुग्णांप्रती सहानुभूती व समावेशक दृष्टिकोन ठेवावा.

### जाहिर नोटीस

तमाम लोकास या नोटीसद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्रीमती. जयश्री संदीप कुलथे आणि श्री. संदीप राम कुलथे दोघे राहणार : बिल्डिंग नं. ३१९/५ गवर्नमेंट कॉलनी, बांद्रा पूर्व, मुंबई यांच्या नावी खालील वर्णन केलेली सदनिका आहे. माझे अशील श्री. प्रकाश चौधरी राहणार : रो हाऊस नं. इ ११३, सेक्टर- १२, खारघर, नवी मुंबई यांनी खाली वर्णन केलेली सदनिका श्रीमती. जयश्री संदीप कुलथे आणि श्री. संदीप राम कुलथे यांच्याकडून यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, विकास करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

| नोड | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ए-८९ | १२ | १०६.४८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क हितसंबंध गहाण, दान,बक्षीस पत्र, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले बसून ७ दिवसाच्या आत खालील पत्त्यावर कागदपत्रासहित लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहे असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहित हरकत नोंदवली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १६/१२/२०२५

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**शॉप नं.४५, पहिला मजला, क्रिस्टल प्लाझा, सेक्टर ७, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत प्रदीप डाळूराम म्हात्रे, राजेश डाळूराम म्हात्रे, संधान डाळूराम म्हात्रे व सुगंधा राजेश पाटील यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे सारडे, येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. ३१/५ यांसी एकूण क्षेत्र ०.१८.०० हे. आर. प्र., पोटखराबा ०.००.०० हे. आर. प्र., (पैकी अविभाज्य क्षेत्राची संपूर्ण विक्री) यांसी आकार रक्कम रुपये १.७५ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख १७ डिसेंबर २०२५

सही/-
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

# गोखले एज्युकेशन सोसायटी लॉ कॉलेजमध्ये मानवी हक्क दिन व वकील दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क व राष्ट्रीय वकील दिनाचे औचित्य साधून गोखले एज्युकेशन सोसायटी खारघर येथील विधी कॉंलेजच्या विद्यार्थ्यांनासाठी मानवी हक्क जनजागृती कार्यक्रम शनिवार दिनांक १३ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मुंबई हायकोर्टातील वकील आदित्य कटकदोंड लाभले होते. तसेच गोखले विधी कॉंलेजच्या प्राचार्य श्रुती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीचे पूजन व गीत गाऊन करण्यात आली होती.यावेळी प्रमुख पाहुणे आदित्य कटकदोंड यांनी विद्यार्थ्यांना

मानवी हक्क जनजागृती व वकीलांचे सामाजिक योगदान आणि हक्कांचे संरक्षण यावर विद्यार्थ्यांनी मानवी हक्काविषयी मार्गदर्शन केले. गोखले एज्युकेशन सोसायटीचे विधी कॉंलेजच्या प्राचार्य श्रुती जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले कि.मानवी हक्क म्हणजे काय?, हा दिवस का साजरा केला जातो?, भारतामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण कसे केले जाते?, मानवी हक्कांचे महत्त्व काय? तसेच लॉं च्या विद्यार्थ्यांनी या विषयातून काय शिकावे? मानवाधिकार दिन आपल्याला प्रत्येक व्यक्तीला सन्मान, न्याय आणि समानतेने वागवण्याची आठवण करून देत असल्याचे त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या वेळी गोखले एज्युकेशन सोसायटीचे एफ.वाय एल.एल.बी च्या विधी विद्यार्थ्यांनी समानता, शिक्षणाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि सन्मानाने जगण्याचा हक्क हे मानवाधिकारांचे महत्त्वाचे भाग असून मानवाधिकारांमुळे भेदभाव, अन्याय आणि हिंसाचारापासून लोकांचे संरक्षण होत असल्याचे नाटिका सादर केल्या होत्या.

या कार्यक्रमाची प्रस्ताविक पुजा चव्हाण मॅंडमने केली तर सुत्रसंचलन मानसी घरत या विद्यार्थीनी केले होते.

### जाहिर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यांत येते की, माझे अशिल मे. के. पी. डेव्हलपर तर्फे भागीदार १) श्री. कैलाश नारायण घरत २) श्री. प्रफूल लालासाहेब गायकवाड, पत्ता. शॉप नंबर-२, तळ मजला, गार्डन व्हिव बिल्डींग, भूखंड-८४, डी-मार्ट रोड, सेक्टर-२१, नेरूळ, नवी मुंबई ४००७०६. यांनी १) श्री. त्रिंबक जानु उर्फ जनार्दन भोईर २) श्री. लहू जनार्दन भोईर ३) श्रीमती. गंगाबाई जोमा भगत ४) श्री. अंकुश गजानन भोईर ५) श्री. गणेश जनार्दन भोईर ६) श्री. उमेश कान्हा भोईर ७) श्री. भगवान माया भोईर ८) श्री. विजय यशवंत भोईर ९) श्री. रघुनाथ नारायण भोईर १०) श्रीमती. गुणाबाई दत्तात्रेय भोपी ११) श्रीमती. पारुबाई मारुती भोईर १२) श्री. समीर मारुती भोईर १३) श्री. प्रकाश मारुती भोईर १४) सौ. संगिता महेश गोवारी १५) सौ. वनिता बळीराम गोवारी १६) सौ. सविता आनंद भोपी राहणार- चिंचपाडा, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड. यांच्या मालकीचा साडेबारा टक्के योजनेअंतर्गत करंजाडे येथे त्रिपक्षीय करारनामा करण्यांत आलेला भूखंड क्र. ७८, सेक्टर-२A, क्षेत्र ८९९.७९ चौ.मी., ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाचे सर्व हक्क अधिकार व फायदा कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षीस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, लोन बुकिंग किंवा इतर जर असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत दावेशी संबंधित कार्यालयीन पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, अन्यथा विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. त्यानंतर कुठलेही प्रकारचे येणाऱ्या हकरती/तक्रारींचा विचार करण्यांत येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**संपादीत केलेल्या भूखंडाचा तपशिल**

| नोड | संचिका क्र. | भूखंड क्रं. | सेक्टर | एकूण क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| करंजाडे | ५६ | ७८ | २ A | ८९९.७९ चौ.मी. |

सही/-
**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, से-१ ए**
**सीबीडी बेलापुर नवी मुंबई**

### जाहिर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे उसर्ली बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उसर्ली बुद्रुक, तालुका : पनवेल, जि.रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) अनंत भुऱ्या काठावले<br>२) दिपक पांडुरंग काठावले<br>३) अनुसया पांडुरंग काठावले<br>४) चंद्रकांत पांडुरंग काठावले<br>५) अलका रामदास वारदे | ६०/४ | ०-१७-५० | ३.१९ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/१२/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

अर्जदारातर्फे वकील
ॲड.कल्पना शरद कुलकर्णी

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायालय क.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अ.क्र.३२६/२०२५
नि.नं.७/ड
नि.नं.२१/०१/२०२६

श्रीमती.सुनिता प्रकाश सोलंकी वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती.सुनिता प्रकाश सोलंकी, रा.उरण, जि.रायगड यांचे पती कै.प्रकाश लक्ष्मण सोलंकी हे एम.एस.ई.बी.च्या सेवेत असताना दि.१०/०४/२०२५ रोजी मौजे : जे.जे.हॉस्पिटल, मुंबई येथे ते मयत झाले आहेत.

अर्जदार यांना त्यांचे पतीचे जागेवर नोकरी मिळण्यासाठी अनुकंपा तत्वावर एम.एस.ई.बी. येथे अर्ज केला असताना एम.एस.ई.बी. चे अधिकारी यांनी त्यांना कोर्टाकडून वारस दाखला आणण्यासाठी सांगितले आहे. म्हणून अर्जदार यांनी दिवाणी कोर्टात किरकोळ अर्ज केलेला आहे.

सबब, कोणाही व्यक्तीचे काही हरकती असल्यास १ महिन्याच्या आत लेखी हरकती मे.कोर्टात दाखल कराव्यात. सबब सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत कोणाच्याही हरकती न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदार हिस वारस दाखला देण्यात येईल. मागाहून आलेल्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दि.१२/१२/२०२५ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण |
|---|---|---|

मा.राठोड मॅडम कोर्ट
ॲड.राजेश बांगर, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५१८/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२६

१) सौ. जयश्री गणेश शर्मा
वय ५७ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. घर नं. ३७७, भिंगारी, मुंबई पुणे रोड, एमईसीबी ऑफिस मागे, भिंगारी, ता. पनवेल, जि. रायगड
२) सौ. नलिनी नागेश मोरे
वय - ६६ वर्षे, धंदा - गृहिणी
रा. घर नं. १०८, मुंबई पुणे रोड, एमईसीबी ऑफिस जवळ, भिंगारी, ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै. गोविंद कानु मढवी यांचे दि. ०४/०८/१९८७ रोजी देहावसन झालेले आहे. कै. गोविंद कानु मढवी यांची आई देखील फार पुर्वी मयत झालेल्या आहेत. कै. गोविंद कानु मढवी यांचा पत्नी कै. चांगुना गोविंद मढवी यांचे देहावसन झालेले आहे. कै. गोविंद कानु मढवी यांचा मुलगा कै. दत्तु उर्फ दत्तात्रेय गोविंद मढवी यांचे दिनांक १५/१०/१९७५ रोजी देहावसन झालेले आहे, तसेच कै. दत्तु उर्फ दत्तात्रेय गोविंद मढवी यांची पत्नी व अर्जदार यांची आई कै. कमल दत्तु उर्फ दत्तात्रेय मढवी यांचे दिनांक २३/०८/२०१९ रोजी देहावसन झालेले आहे. सबब मयत कै. गोविंद कानु मढवी यांचे मृत्युपश्चात सदर अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत सौ. जयश्री गणेश शर्मा वगैरे हयांनी कै. गोविंद कानु मढवी यांच सामाईक मालकीची मौजे काळुंद्रे, ता. पनवेल, जि. रायगड येथील सिडको प्रशासनाने संपादित केलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| अनु.क्रं. | युनिट केस क्र. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | काळुंद्रे १५ (२०) | ९०/४ अे | ०-४-०० | ०.७९ |

वर सौ. जयश्री गणेश शर्मा वगैरे हे कै. गोविंद कानु मढवी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट सौ. जयश्री गणेश शर्मा वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर निशा गजानन मढवी वगैरे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ११/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# आगरी समाज संस्थेतर्फे रक्तदान शिबिर; ५० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक जाणिवेतून जिल्हा रक्तपेढी अलिबाग यांच्या माध्यमातून आगरी समाज संस्था, अलिबाग यांच्या पुढाकाराने व कच्छ युवक संघ व लायन्स क्लब अलिबाग यांच्या सहकार्याने रविवार, दिनांक १४ डिसेंबर २०२५ कच्छी भवन, श्रीबाग - अलिबाग येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये अपघात, शस्त्रक्रिया, गर्भवती माता, थॅलेसेमिया तसेच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवरील उपचारांसाठी रक्ताची मोठ्या प्रमाणात गरज भासते. मात्र वाढती मागणी व अपुरा रक्तसाठा यामुळे अनेक वेळा रुग्णांना अडचणी येतात. ही गरज लक्षात घेऊन आगरी समाज संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत या रक्तदान शिबिराचे आयोजन केले. या संदेशानुसार प्रत्येक निरोगी नागरिकाने रक्तदान करून मानवतेचे श्रेष्ठ कार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. रक्तदानामुळे कोणताही शारीरिक अपाय होत नसून शरीरात नव्या रक्तनिर्मितीस चालना मिळते, असेही आयोजकांनी सांगितले.

या शिबिरात आगरी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश पाटील, सचिव प्रभाकर ठाकूर, सदस्य जयवंत थळे, मेहुल पाटील,नयन कवळे, महेंद्र पाटील, भावेश पटेल यांनी स्वतः रक्तदान करून नवीन रक्तदात्यांना प्रेरणा दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपाध्यक्ष सुनील तांबडकर, खजिनदार ॲड. सचिन पाटील, उदय म्हात्रे, राजेंद्र पाटील, वैभव पाटील, मनोहर पाटील, बिपीन टेमकर, श्रेयस ठाकूर तसेच कच्छ युवक संघचे धर्मेश देडिया व भावेश पटेल यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक अनंत म्हात्रे, शशिकांत मिठाग्री, प्रकाश मिठाग्री, लायन्स क्लब अलिबागचे अध्यक्ष प्रदीप नाईक, क्षात्रैक्य समाजाचे अध्यक्ष कबन नाईक, उपसरपंच प्रल्हाद पाटील, पत्रकार ॲड. रत्नाकर पाटील, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे . सचिव विकास पाटील रायगड फोटोग्राफर असोसिएशनचेच उपाध्यक्ष समीर मालोदे खजिनदार जितेंद्र मेहता व अंकुश पाटील यांनी उपस्थित राहून आयोजकांचे मनोबल वाढवले. या शिबिरासाठी जिल्हा रक्तपेढी अलिबाग येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यामध्ये डॉ. भैरवी मालवणकर, मनोहर हाडस, जयश इदाते, वैभव कांबळे, रामकुमार निकस, स्वप्निल जगताप, पूनम पाटील, महेश घाडगे व बाबासाहेब पोटे यांचा समावेश होता.

अर्जदारातर्फे वकील ॲड. नरेश म्हस्कर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६६३/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०१/२०२६

१) श्री नवनाथ विठ्ठल पाटील
वय ५८ वर्षे, धंदा- शेती
२) श्री. अशोक विठ्ठल पाटील
वय ४३ वर्षे, धंदा- शेती
अर्जदार क्र. १ व २ दोघेही राहणारः
मु. मुर्बी, पो. खारघर ता. पनवेल, जि. रायगड
३) सौ. अंजनी सुखदेव भोईर
वय ५१ वर्षे, धंदा घरकाम
रा. रूम नं. १, प्लॉट नं. १४७,
नामदेव भोईर निवास, राधाकृष्ण मंदीर समोर,
से. ३१, वाशी गाव, नवी मुंबई जि. ठाणे.
४) सौ. रंजना मोहन पावशे
वय ३८ वर्षे, धंदा घरकाम
रा. पिसार्वे, पो. तळोजे पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड.
५) सौ. यशोदा विक्रम पाटील
वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. उत्तरशिव,
पो. पडले, ता. व जि. ठाणे
६) सौ. निर्मला सुभाष मोकल
वय ४४ वर्षे, धंदा- घरकाम
रा. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील कै. विठ्ठल काळया पाटील हे दिनांक १४/०१/२०२५ रोजी ए.आर. पाटील मल्टिस्पेशलिटी हॉस्पीटल प्रा. लि. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाले आहेत.

तसेच अर्जदार क्र. १ ते ६ यांची आई कै. सिताबाई विठ्ठल पाटील ही दिनांक ०२/०१/२०१७ रोजी सहस्त्रबुदधे हॉस्पीटल पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ६ यांची आजी व कै. विठ्ठल काळया पाटील यांची आई व कै. सिताबाई विठ्ठल पाटील यांची सासू कै. धानीबाई काळया पाटील ही दिनांक १०/०४/१९८९ रोजी मयत झालेली आहे.

कै. विठ्ठल काळया पाटील यांचे वडील कै. काळया कृष्णा पाटील यांचे सामाईक मालकीचे मौजे ओवे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेत जमिनीच्या मिळकती हया महाराष्ट्र शासनाने सिडको तर्फे नवी मुंबई प्रकल्पाकरीता १२.५ टक्के गाववठाण विस्तार योजनेअंतर्गत कायमची संपादित केलेली आहे. सदर मिळकतींचे सविस्तर वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | युनिट केस नं. | गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६५ | ओवे | २०६ | १+२B/५ | ०.०१.४ |
| २ | १२० | ओवे | २२५ | १+२ | ०.३९.० |
| ३ | | ओवे | १९७ | १+२+३+४/२ | ०.१५.६ |
| ४ | | ओवे | २०६ | १+२B/२ | ०.२०.७ |
| ५ | | ओवे | २०५ | ६A | ०.१२.९ |
| ६ | | ओवे | २०५ | ५ | ०.०२.० |
| ७ | | ओवे | २८५ | १+२A | ०.३१.० |
| ८ | ५९६ बी | ओवे | २०५ | ६B | ०.१०.० |

तरी वरील मिळकतींबाबत कै. विठ्ठल काळया पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्याकामी कोणाच्याही, कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत मेहरबान कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ११/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्याने नोटीस दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# कर्नाळा जवळील जश्न रिसॉर्ट पर्यटकांचे विशेष आकर्षण

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल ।** पनवेलच्या हाकेच्या अंतरावर निसर्गाच्या श्रृष्टीसौद्यर्याच्या कुशीत वसलेले जश्न रीसॉर्ट हे पर्यटकांच्या आवडीचे रीसॉर्ट ठरत आहे सन २०११ला मनजीतसिंग भेला यांनी अपार मेहनतीच्या जोरावर या रीसॉर्टला सुंदर व आकर्षक व विलोभनिय सजावट केल्याने एकदा आलेले पर्यटक आपल्या नातेवाईक मित्रपरीवार यांना नक्कीच सूचवित असतात की जश्न रीसॉर्ट इज ग्रेट..येथील स्वीमींग पुलाचे स्वच्छ पाणी,नाश्ता जेवण्याकरीता स्वतंत्र आरामदाई आसन व्यवस्था, भले मोठे हीरवेगार लॉन, रहाण्याकरीता प्रशस्त रूम, व तरूणाईला स्वच्छंद थीरकण्याकरीता डॉल्बी साऊंन्ड सिस्टीमची सोय असल्याने तरूणांची ओढ या रीसॉर्टकडे अधिक असल्याचे बोलले जात आहे.

त्यातच आलेल्या पर्यटकांतील गायनाची आवडही पुर्ण करण्याचा मोह झालाच तर स्टीरीओ कराओके सिस्टीमची सोयही येथे उपलब्ध असल्याने आपल्या आवाजाची जादुही आलेल्या मित्रपरीवारांमध्ये पारखता



येते दिवसेंदीवस जश्न रीसॉर्ट मध्ये पर्यंटकांचा ओघ या ठीकाणी वाढत आहे या रीसॉर्ट मध्ये ग्रुप बुकींगची रीझनेबल बुकींग करीता मनजीत सिंग भेला यांचा मुलगा परमिंदर सिंग हा पहात आहे. या भव्य दिव्य रीसॉर्टमध्ये पार्कींगची मोठ्या प्रमाणात सोय असल्याने या ठिकाणी बर्थ डे पार्टी, हळदीसमारंभ लग्न सोहळे,कार्पोरेट कंपन्याचे गेट टुगेदर, पार्टीचे शिस्तबध्द पध्दतीने आनंदी वातावरणात आयोजन होत असल्याने कार्पोरेट कंपन्यांचे बुकींगही दिवसेंदिवस वाढत आहे.

येथील नाश्ता जेवण व रात्रीच्या मंद प्रकाशात व थंडगार वातावरणात डीनरचा स्वाद घेण्याकरीता अनेक पर्यटक ग्रुप बुकींग करून धकाधकीच्या जीवनात वेळात वेळ काढुन आपल्या परीवारातील पारीवारीक आनंद



निसर्ग सौदर्यात मिळविण्याकरीता एक विरंगुळा म्हणुन जश्न रीसॉर्टला पहीली पसंती देत आहेत. पावसाळयात तर या रीसॉर्टमध्ये तर खुप सुंदर वाहणारे डोंगरावरून खळखळणारे झरे है पर्यंटकांचे विषेश आर्कषण ठरत असते असे पर्यंटकांमध्ये बोलले जात आहे

# प्रतापगडानंतर उमरठकडे येऊन रायगडाकडे शिवप्रेमींनी जावे, अशी शिवसृष्टी साकारण्याचा प्रयत्न : ना.भरतशेठ गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना १० कोटी रूपये देण्याचा शब्द दिल्यानुसार नरवीर तानाजी मालुसरे यांचा भव्य वाडा, भव्य पुतळा समाधीस्थळ आणि स्मारकस्थळ सुशोभिकरण कामासाठी १० कोटींचा निधी उपलब्ध केल्याने शिवप्रेमींनी प्रतापगडानंतर उमरठकडे येऊन शिवराजधानी दूर्गराज रायगडकडे जावे, अशी शिवसृष्टी साकारण्याचा प्रयत्न नजिकच्या काळात करणार असल्याची ग्वाही मंत्री भरतशेठ गोगावले यांनी रामाचे उमरठ येथील नरवीरांच्या ऐतिहासिक वाडयाच्या भूमिपूजन सोहळयाप्रसंगी दिली.

याप्रसंगी व्यासपिठावर गटविकास अधिकारी दिप्ती गाट, विस्तारअधिकारी हंबीर, माजी राजिप उपाध्यक्ष तथा जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, माजी उपसभापती शैलेश सल्लागरे, संपर्कप्रमुख किशोर जाधव, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, महिला तालुका प्रमुख सुवर्णा संदेश कदम, सतीश शिंदे, अनिल पवार, संजय मोदी, लक्ष्मण मोरे, काशिनाथ कुंभार, उद्योजक रामदास कळंबे, उमरठचे सरपंच जयराम मोरे, माजी सरपंच इंद्रजित कळंबे, बोरजचे माजी सरपंच भरत चोरगे, नाना कळंबे तसेच अन्य



मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मंत्री भरतशेठ गोगा-वले यांनी, रायगडच्या पायथ्याशी शासनामार्फत शिवसृष्टीसाठी घेतलेल्या जमिनीवर शिवसृष्टी साकारण्यासाठी निर्धारित केलेला निधी आता शंभर कोटींपेक्षा अधिक लागणार आहे. उमरठच्या सौंदर्यीकरणासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. मात्र, काम दर्जेदार होण्यासाठी ग्रामस्थ आणि शिवप्रेमींनीदेखील लक्ष दिले पाहिजे. काम पुर्ण होईल तेव्हा त्यावेळी जे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री असतील त्यांना याठिकाणी उदघाटनासाठी निमंत्रित करू, असेही आश्वासन यावेळी दिले.

प्रारंभी माजी राजिप उपाध्यक्ष तथा जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे यांनी उमरठच्या विकासाची सुरूवात अनेकांनी केली, मात्र पूर्तता करण्यासाठी आपले सर्वांचे भाग्य म्हणून भरतशेठ मंत्री झाले आहे. उमरठचा ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून विकास करताना किमान १०० कोटींचा निधी उपलब्ध होण्याची गरज असल्याचे सांगून माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी ५ कोटींच्या सौंदर्यीकरणाचे उदघाटन केल्यानंतर विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावरून दिलेल्या ५ कोटींच्या निधीतील कामांचे लोकार्पण ऑनलाईन करताना आणखी १० कोटींचा निधी देण्याचा शब्द दिला होता. त्या शब्दाची पूर्तता मंत्री भरतशेठ यांनी पाठपुरावा करून करून घेतली आहे, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

नरवीर तानाजी मालुसरे यांचा ऐतिहासिक भव्य वाडा, भव्य पुतळा आणि समाधी व स्मारक परिसर सुशोभिकरण भूमीपूजन तसेच विठ्ठल मंदिर सभागृह भूमिपूजन केल्यानंतर उमरठ ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय उद्धाटनही मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याहस्ते करण्यात आले असल्याचे यावेळी जाहिर करून पोलादपूर तालुक्यात संपूर्ण दिवसभर विकासकामांची भूमिपूजन आणि उदघाटन तसेच पक्षप्रवेशाद्वारे शिवसेनेच्या भगव्याचे वादळ पाहण्यास मिळणार असल्याचे यावेळी चंद्रकांत कळंबे यांनी सांगितले.

# अलिबाग तालुका तलाठी-मंडळ अधिकारी संघाच्या अध्यक्षपदी सुदर्शन सावंत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



अलिबाग तालुका ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) व मंडळ अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदाच्या निवडीसाठी सर्वसाधारण सभा आज डिसेंबर दि. १५ पार पडली. या सभेस तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेदरम्यान सविस्तर विचारविनिमय झाल्यानंतर अध्यक्षपदासाठी सुदर्शन दत्तात्रय सावंत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

मागील सहा महिन्यांपासून रिक्त असलेले अलिबाग तालुका तलाठी-मंडळ अधिकारी संघाचे अध्यक्षपद आज अधिकृतपणे भरले गेले. नवीन अध्यक्षांच्या निवडीमुळे तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या विविध अडचणी, समस्या व प्रलंबित प्रश्न सोडविण्यास गती मिळणार असून संघटनेच्या कार्याला नवे बळ मिळेल, अशी भावना उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली.

# रायगड डाक विभाग ऑल इंडियात अव्वल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

केवळ पत्रव्यवहारापुरता मर्यादित न राहता सामान्य नागरिकांच्या भवितव्याला सुरक्षित करणाऱ्या बचत व विमा योजनांच्या माध्यमातून डाक विभाग सामाजिक बांधिलकी जपत आहे. जंगल, डोंगर आणि समुद्राने वेढलेल्या, सुमारे ९० टक्के ग्रामीण भाग असलेल्या रायगड जिल्ह्यात विमा व बचतीबाबतचा मर्यादित प्रतिसाद बदलत रायगड डाक विभागाने देशपातळीवर इतिहास रचला आहे.

डाक विभागाकडून दरमहा ठराविक दिवशी साजरा होणाऱ्या 'लॉगिन डे' उपक्रमांतर्गत अधिकाधिक नागरिकांपर्यंत विमा संरक्षण पोहोचवण्याचा संकल्प राबवला जातो. इथे बिझनेस होत नाही ही सर्वसाधारण धारणा मोडीत काढत, रायगडचे डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी सेवाभावी दृष्टिकोनातून कामगिरीचा नवा मापदंड उभा केला. आपली कामगिरी आकड्यांसाठी नाही, ती सेवेची आहे. जास्तीत जास्त लोकांचे भले कसे करता येईल, हेच आपले खरे ध्येय असले पाहिजे, या विचारातून त्यांनी कर्मचारी वर्गात विश्वास, अभिमान आणि आत्मविश्वास निर्माण केला. 'टार्गेट' हा केवळ आकडा नसून, कामगिरी अशी असावी की ती पाहून स्वतःलाच अभिमान वाटावा, असा ठाम पण हळुवार संवाद त्यांनी प्रत्येक कर्मचाऱ्याशी साधला. गेल्या वर्षी बचत खात्यांच्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद कामगिरी केल्यानंतर, यावर्षी विमा ही काळाची गरज आहे या वास्तवावर लक्ष केंद्रीत करत पोस्टल लाईफ इन्शुरन्स आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनांचा प्रभावी प्रसार करण्यात आला.

# माणगांवात सायंकाळपासून रात्रभर मच्छर नागरिकांना हैराण करतात.. फवारणी यंत्रणा बधीर जाहली

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



माणगांव शहरातील जवळपास सर्वच भागात मच्छरचे (डास) प्रमाण भयंकर वाढले असुन कुठेही दिवसा ढवळ्या घराबाहेर उभे राहा ते चावल्यानंतर खाजवताना समजते डास चावला, संध्याकाळी घराची दार खिडक्या आठवणीने लावली जातात उघडी राहीली कि मच्छरचा शिरकाव हमखास. या सगळ्या परिस्थितीकडे पाहता एकच सत्य समोर येतं; धूर फवारणी कागदावरच आणि डासांची सत्ता थेट मैदानात! नगरपंचायत गाढ झोपेत असताना माणगांव जाग आहे; मात्र मच्छर रात्रंदिवस ड्युटीवर शेवटी डास मारायला टाळ्या वाजवणं थांबवून, आता झोपलेल्या प्रशासनाला उठवण्यासाठी ढोल-ताशे वाजवण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

डास प्रतिबंधक यंत्र आणि मच्छर अगरबत्ती, सर्वच लोक वसाहतीतील घरा-घरातून वापरात येत आहेत. यंदा झालेली अतिवृष्टी परिणामी परिसरातील गटारे, नाले तुंबले जागोजागी पडलेला प्लास्टिक कचरा आणि पडलेले पावसाचे पाणी, वसाहतीतील सांडपाणी छोट्यामोठ्या डबक्यातून, कुंड्या अगदी घराबाहेर पडलेल्या नारळाच्या करवंट्यात साठते. या पाण्यात या उपद्रवी रक्तपिपासू डास नामक जीवांची पैदास वाढली आहे.

शहरातील गटार सदृष्य अस्वच्छ केलेला कालवा हा डास प्रजननास पोषक ठरुन आता लोकांना मच्छर हैराण करतात, पिडितांस चित्रपटातील नाना पाटेकरचा तो डायलॉग एक मच्छर आदमी को टाळी पिटण्यास भाग पाडतो! तसा सूर आळवला जात आहे. एवढ 'खाजवंत' उघड वास्तव असताना शहरात कोणतीही प्रतिबंधात्मक उपाय योजना होत नाही. सुदैवाने अजुनही त्या खतरनाक डेंग्यू, मलेरिया डासांची पैदास जवळपास नसल्याने अजुनही आरोग्य सलामत आहे. पण काय भरोसा हे रोगाचे डास झालेच तर मात्र आरोग्य नक्कीच धोक्यात येईल! हे कुण्या ज्योतिषास विचारणे न लागो!

संबधीत जबाबदार नगरपंचायतीत या धूर फवारणीसाठी मोठ्या गाज्या वाज्यात धूर फवारणी यंत्र निधी खर्चून, फॉगिंग मशिन आणल्या गेल्या, पण आज त्या कुठल्या डबक्यात धुळ खात पडल्यात कोणास ठाऊक! अस बोलतात. शहरातील खोदकामे, स्वच्छतेविषयी अनास्था हेच चित्र कायम दिसून येते. लाखोचा निधी स्वच्छतेस वापरात येतो. ही दरवर्षीची पूनरूद्भवी कामे करण्यात कसुराई काय कामाची? खरतर ही डास प्रतिबंधात्मक फवारणी कधी होणार? सवाल ऐरणीवर आहे. तोपर्यंत मच्छर मारत टाळ्या पिटणे व डासांना रक्तदान करुन खाजवणे एवढेच आपल्या हाती! अस लोक बोलत आहेत.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत वत्सला हरिश्चंद्र भगत व इतर यांच्या वडीलोपार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा -रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे खोपटे (कचेरपाडा), येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं. ३१/५ यांसी एकूण क्षेत्र ००.११.६० हे. आर. प्र., पोटखराबा ०.००.५० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये १.०१ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख १७ डिसेंबर २०२५

सही/-

**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**

**खरेदीदारातर्फे वकिल**

**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**

**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**



बोराडे-कपूर साो

वकील श्री.अमित अरुण जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१५११/२०२५

नि.नं.६/ड

ने.ता.१५/०१/२०२६

१. रूपाली रंगराव सोरटे
वय : ६४ वर्षे, धंदाः गृहीणी,
राहणार : राहुल नगर क्रं. ३,
वसंतराव कॉलेज जवळ, सायन-ट्राम्बे रोड,
सायन मुंबई महाराष्ट्र : ४०००१२

२. संकेत रंगराव सोरटे
वय : ३७ वर्षे, धंदा व्यवसाय,
राहणार : रूम क्रं. १०४, पहीला मजला,
बिल्डिंग क्रं. ८/बी, मानसरोवर कॉम्लेक्स
सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
प्लॉट क्रं. १ते ६ आणि १९ ते २६,
सेक्टर ३४, कामोठे, पनवेल, रायगड,
महाराष्ट्र : ४१०२०६

३. क्षितिजा रंगराव सोरटे
वय : ३३ वर्षे, धंदा गृहीणी,
राहणार : रूम क्रं. १०४, पहीला मजला,
बिल्डिंग क्रं. ८/बी, मानसरोवर कॉम्लेक्स
सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
प्लॉट क्रं. १ ते ६ आणि १९ ते २६,
सेक्टर ३४, कामोठे, पनवेल, रायगड,
महाराष्ट्र : ४१०२०६ अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही

वरील अर्जदारांतर्फे या जाहीर नोटीसीव्दारे सर्व जनतेस असे कळविण्यात येते की, रंगराव दादू सोरटे यांचे निधन दिनांकः ३०/०७/२०१९ रोजी झाले. अर्जदार यांच्या वडीलांचा मृत्यु हा राहत्या घरी रूम क्रं. १०४, बिल्डिंग क्रं. ८/ बी, मानसरोवर कॉम्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट क्रं. १ ते ६ आणि १९ ते २६, सेक्टर : ३४, कामोठे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०६. येथे झाला आहे. मयत रंगराव दादू सोरटे यांना अर्जदार क्रं. १, अर्जदार क्रं. २ आणि अर्जदार क्रं. ३ हेच कायदेशीर वारस आहेत. रंगराव दादू सोरटे यांच्या नावे खालील वर्णनाची स्थावर मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| क्रं. | गावाचे नाव | मिळकतीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | रूम क्रं. १०४, पहीला मजला, बिल्डिंग क्रं. ८/बी, मानसरोवर कॉम्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट क्रं. १ ते ६ आणि १९ ते २६, सेक्टर ३४ कामोठे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०६. क्षेत्र : २८० चौ.मी. कारपेट |

सबब मिळकतीचा वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या मिळकतीच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत मे. न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे मिळकतीचा वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. ६ माहे डिसेंबर सन २०२५ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**